# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक : 10/एनजीपी/वेतन-तक्रार/2016/ ५०३

दिनांक : 20 MAY 2016

प्रति,

प्राचार्य/ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,

सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/

हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी, पदविका तंत्रनिकेतन,

महाराष्ट्र राज्य.

विषय : विनाअनुदानित तंत्रशिक्षण संस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत अनुचित प्रथा बंद करणेबाबत....

उपरोक्त विषयाबाबत असे निदर्शनास आलेले आहे की, विनाअनुदानित तंत्रशिक्षण संस्थांमध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कागदोपत्री पूर्ण वेतन अदा केले आहे असे दाखवून वेतनामधून दरमहा ठराविक रक्कम संस्थेमार्फत कापून घेण्यात येते व याबाबत संस्थेत कार्यरत कर्मचारी / संघटनांमार्फत अशा आशयाच्या तक्रारी वारंवार या संचालनालयास प्राप्त होत आहेत.

त्याअनुषंगाने राज्यातील सर्व विनाअनुदानित, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँडकेटरींग टेक्नॉलॉजी, पदविका तंत्रनिकेतनांच्या संस्था प्रमुखांना सदर परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील सर्व शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन नजिकच्या राष्ट्रीयकृत/ शेड्यूल्ड बँकेमार्फत संबंधीत कर्मचाऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करावे.

तसेच राज्यातील सर्व विनाअनुदानित, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँडकेटरींग टेक्नॉलॉजी, पदविका तंत्रनिकेतनांत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही सदर परिपत्रकान्वये असे कळविण्यात येते की, कर्मचाऱ्यांनी बँकेमध्ये व्यवहार करतांना(वेतनाबाबत) Withdrawl Slip न वापरता ATM/ Cheque Book यांचा वापर करुन खात्यातून रक्कम काढावी. कर्मचाऱ्यांनी कोऱ्या Withdrawl Slip वर सह्या करुन त्रयस्थांना देऊन आर्थिक देवाण-घेवाण केल्यास हे संचालनालय याबाबतच्या तक्रारींस जबाबदार राहणार नाही.

विवि website वर टाके
५-८
22-5-2016

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त बाब आपल्या अखत्यारीतील सर्व विनाअनुदानित, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँडकेटरींग टेक्नॉलॉजी, पदविका तंत्रनिकेतनांच्या (व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या) संस्थांच्या संस्था प्रमुखांच्या तसेच त्यांच्यामार्फत संस्थेत कार्यरत शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

\\DTENS1\desk10\DINESH\takrar forwording Letter 2015-16 New 25.2.2016.docx